**नियमित दिवाणी दावा क्र.१/२००८**
**वादीतर्फे सा.क्र.८**
**निशाणी क्र.१७७ वर पुढे सुरु...**

शपथेवर पुढे सुरु –

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. निंबाळकर यांच्यामार्फत उलटतपासः**

७. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही शेताची मोजणी करताना सदरचे शेत कोणाच्या मालकीचे आहे, हे पाहणे आवश्यक आहे. मोजणी करण्यापुर्वी आम्ही खरेदीखत व ७/१२ इ. कागदपत्र पाहतो. गट क्र.६३१ चे पुर्ण क्षेत्रफळ ७ हे. २६ आर इतके आहे. त्या क्षेत्रापैकी २ हे. ३ आर इतके गेले आहे. त्यानंतर शिल्लक क्षेत्र ५ हे. २३ आर इतके राहिले. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमीन तलावामध्ये भुसंपादन होण्यापुर्वी सदर शेतीची वाटणी झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.६३१ मध्ये एकुण ७ हिस्से झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वाटणीमधील पश्चिमेकडील पहिला हिस्सा हा सखाराम यास मिळाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सखाराम याचा हिस्सा त्याच्या मृत्युपश्चात त्याचे वारस म्हणून त्याची पत्नी इंदुबाई व इतर यांना मिळाला. त्यांना मिळालेले क्षेत्र १ हे. ३ आर इतके होते. त्यापैकी तलावामध्ये ० हे. ४३ आर इतकी तलावामध्ये शेती गेलेली आहे. त्यापैकी त्यांच्याकडे ० हे. ६० आर शेती शिल्लक राहिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, इंदुबाई व इतर यांनी त्यांच्याकडे असलेली ६० आर शेती ही प्रतिवादी यास विक्री केली. मी सदर मोजणी करतेवेळी जी जमीन तलावामध्ये संपादित झाली होती, ती जमीन देखील विचारात घेतली होती.

८. आता मला मोर क्र.३/१९९५–९६ चा नकाशाची झेरॉक्स प्रत दाखविण्यात आली. सदरची प्रत उलटतपासामध्ये साक्षीदार यास दाखविल्याने त्यास **नि.क्र.१८३** देण्यात येत आहे. सदर नकाशामध्ये गट क्र.६३१ पैकी कायम असे लिहीलेले आहे. नकाशातील तोच भाग मी केलेल्या मोजणी नकाशामध्ये W V U T W या आद्यक्षरांनी दाखविलेला आहे. नि.क्र.१८३ च्या नकाशाची मोजणी प्लेन टेबलने केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्लेन टेबलने मोजणी करताना बेस लाईन चुकली की, नकाशा चुकतो. हे म्हणणे खरे आहे की, प्लेन टेबलने मोजणी करताना बेस लाईन चुकली की, वहिवाट चुकते.

हे म्हणणे खरे आहे की, वहिवाटीचा नकाशा चुकल्यास तो सुपर इंम्पोज केल्यास पुर्ण नकाशा चुकतो. आता मला नि.क्र.१७८ कडील नकाशा दाखविण्यात आला. सदर नकाशामध्ये X A1 Z A2 A3 A4 A5 A6 O P Q R S T U V W X या आद्यक्षरांनी दाखविलेले क्षेत्र तलावामध्ये संपादित झाले आहे. W V U T W या क्षेत्रामध्ये मोजणी करतेवेळी पाणी आढळून आले. सदरचे क्षेत्र हे तलावाच्या भिंतीला लागून आढळून आले. हे म्हणणे खरे आहे की, तलावाच्या भिंतीच्या उत्तरेला नकाशामधील W V या अक्षराच्या उत्तरेला तलावाचे क्षेत्र आढळले. हे म्हणणे खरे आहे की, W V U T च्या पुर्वेला, पश्चिमेला, उत्तरेला व दक्षिणेला तलावाकरीता संपादित झालेली जमीन आहे. सदर नकाशामध्ये W V U T या आद्यक्षरांनी दाखविलेले क्षेत्र हे तलावाच्या भिंतीच्या आतमध्ये आहे. सन १९९५–९६ साली मोजणी करतेवेळी W V U T W हे क्षेत्र अतिरीक्त क्षेत्र आलेले होते व त्यावर कोणाची मालकी नव्हती, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१७८ च्या नकाशामध्ये X A1 Z A2 A4 A5 A6 O या लाईनच्या दक्षिण बाजूचे व पश्चिम बाजूचे क्षेत्र तलावाकरीता संपादित झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी १९९५–९६ साली मोजणी झाले त्यावेळी तुकडेबंदी लागू होती व त्यावेळी २ एकर क्षेत्राच्या खाली तुकडा पाडता येत नव्हता.

९. हे म्हणणे खरे नाही की, मी मोजणी करताना सदर क्षेत्राबाबतचे वाटणीपत्र विचारात घेतले इतर कागदपत्र विचारात घेतले नाहीत. प्रतिवादी यांच्या वहिवाटीच्या क्षेत्राच्या पुर्वेला ज्ञानेश्वर वानखडे यांची वहिवाट आढळून आली. मी ज्ञानेश्वर वानखडे यांची खरेदीखत पाहिले त्यानुसार त्यांच्याकडे एकुण १ हे. ४ आर विकत घेतल्याचे दिसले. ज्ञानेश्वर वानखडे यांच्या वहिवाटीमध्ये मला मोजणीमध्ये ३९ आर क्षेत्र आढळून आले. ज्ञानेश्वर वानखडे यांच्या पुर्वेला सौ. नंदा जगताप यांची वहिवाट आढळून आली. हे म्हणणे खरे आहे की, नंदा भास्कर ह्या वादी यांच्या पत्नी आहेत. नंदा भास्कर यांच्या वहिवाटीत एकुण ७७ आर क्षेत्र आढळले. आता मला नि.क्र.१७८ कडील नकाशा दाखविण्यात आला, त्यामध्ये C D E A7 A6 A5 A4 A3 C इ. क्षेत्र नंदा भास्कर हिच्या वहिवाटीत आढळून आले. A6 A7 M N O A6 हे क्षेत्र मोजणीच्यावेळी पडीक असल्याचे आढळून आले, सदर

पडीक क्षेत्र २७ आर इतके आहे. नंदा भास्करचा ७/१२ मी पाहिलेला आहे. त्यामध्ये तिच्या नावे ४३ आर इतके क्षेत्र आहे.

१०. वादीचा ७/१२ मी पाहिलेला आहे, त्यामध्ये त्याचे क्षेत्र ६९ आर इतके आहे. A6 A7 M N O हे क्षेत्र कोणाच्या मालकीचे आहे, याबाबत मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नंदा भास्कर हिच्या पुर्वेस असणाऱ्या वहिवाट धारकाने सदर पडीक असलेल्या जमीनीवर मालकी अधिकार दाखविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नंदा भास्कर हिच्या वहितीच्या क्षेत्राच्या दक्षिण बाजूस पडीक जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणी केली त्यावेळी प्रतिवादी सुरेश बगेरे हजर नव्हते, त्याच्या वतीने त्यांचा मुलगा हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरची मोजणी वादीने वहिवाट दाखविली त्याप्रमाणे मी मोजणी केली. मोजणीच्यावेळी हजर असलेल्या ७/१२ तील सहधारक यांनी वहिवाट दाखविली. हे म्हणणे खरे नाही की, सदरची मोजणी मी वादीच्या सांगण्याप्रमाणे केली व ती मोजणी चुकीची केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणी करताना जी परिस्थिती त्या वेळची होती, ती परिस्थिती मी नकाशामध्ये दर्शविलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणीदरम्यान वादी व नंदा भास्कर यांचे क्षेत्र मला जागेवर आढळून आले असताना देखील मी ते क्षेत्र नकाशामध्ये नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या ७/१२ नुसार असणारे क्षेत्र हे मोजणीच्या समयी त्याच्या ताब्यामध्ये आढळून आले, परंतु ते मी नकाशामध्ये दाखविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, A6 A7 M N O हे पडीक क्षेत्र नंदा भास्कर व वादी यांच्या एकुण क्षेत्रापैकी आढळले, परंतु ते मी नकाशामध्ये पडीक दाखविलेले आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– ३०.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.31 10:48:46 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ३०/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ३०/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ३१/०१/२०२६ |